ePaper

## “पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल”: फडणवीस



॥ वर्ष - 8 । अंक - 38 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- आधार घेऊन चालतोय स्टोक्स
- नदीमला गिफ्ट म्हणून देणार ‘म्हैस’
- पूर आणि भूस्खलनाचा कहर
- तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल


www.mahaenews.com ॥ मंगळवार, दिनांक 13 ऑगस्ट 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## स्वार्थासाठी बाप बदलला, तर जनतेला ते पटत नाही

# वाघाच्या आवाजाचं म्याव म्याव झालंय!

### नाव न घेता अमोल कोल्हेंची अजित पवारांवर टीका

। बारामती । महाईन्यूज

‘किती दमदाटी केली, तरी लोक आता बघत नाही. बघतो तुला, बघून घेतो स्वाभिमानाला आमच्या खपत नाही. वस्तु चोरली, रंग बदलला तरी चोरी काही लपत नाही. स्वार्थासाठी बाप बदलला, तर जनतेला ते पटत नाही’, या चारोळीचा भाषणात वापर करत खासदार अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नाव न घेता खोचक टीका केली. अमोल कोल्हे आज बारामतीत शिवस्वराज्य यात्रा निमित्त आयोजित सभेत बोलत होते.



#### त्यांची जागा दाखवून द्यायची आता वेळ आली आहे...

अमोल कोल्हे शिवस्वराज्य यात्रेतील सभेत ते पुढे म्हणाले, बारामतीकरांनी लोकसभेला दाखवून दिले आहे. आता वेळ आली आहे, त्यांची जागा दाखवून द्यायची. साहेबांच्या नेतृत्वाखाली राज्य नव्हे देशातील सरकार बदलणार आहोत, त्यामुळे लोकसभेसारखे काम आपल्याला करायचे असल्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

सध्या सुरू असलेल्या लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना अमोल कोल्हे म्हणाले की, काही योजनांचा पोहा पोहा...सुरू आहे. या योजनांची ‘फोड’ बारामतीकरांसारखी कोणीही करू शकत नाही. नऊ वर्ष भाऊ रोज दारावरून जातो कधीच वळत नाही आणि अचानक भाऊ दारात आला आणि म्हणाला रक्षाबंधन करतो ओवाळणी घाल. भावाने सांगावं बहिणीने काय करावे. इतके वर्ष आठवण झाली नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी बहीण लाडकी नव्हती. निवडणुकीनंतर ही जर परिस्थिती येत असेल तर काय डोळ्यासमोर ठेवून कोण निर्णय घेते हे पाहिलं पाहिजे, असंही कोल्हे यावेळी म्हणाले.

#### लाडकी बहीण ही योजना कशासाठी?

वाघाच्या आवाजाचं म्याव म्याव झालं की काय...कळेना झालंय... काहीजण म्हणतात की, विकासासाठी लोक जातात. हे आपण अनेकदा ऐकतो. आम्हाला एक कायम दरारातील आवाज ऐकायची सवय होती. वाघाच्या आवाजाचं म्याव म्याव झालं की काय...कळेना झालेय, असं म्हणत अमोल कोल्हे यांनी नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवारांवर सडकून टीका केली.

दरम्यान, नांदेडमध्ये सभेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही अजित पवारांवर, लोकसभेत बहिणीच्या विरोधात बायकोला उभे केले असल्याचे पाहिले आहे, असं म्हणत अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. लाडकी बहीण ही योजना कशासाठी आहे हे अजित पवार यांच्या भाषणातून समोर आले असल्याचंही ते म्हणाले.

---

## सव्वा महिन्यात वाढले लाखभर मतदार

### चिंचवड, हडपसर ठरले जिल्ह्यातील सर्वाधिक मोठे मतदारसंघ

। बारामती । महाईन्यूज

लोकसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमधून नावे गायब झाल्याचा सर्वाधिक फटका ‘महायुती’ला बसल्याच्या विश्लेषणानंतर राज्य सरकारकडून जिल्हा प्रशासनाची चांगलीच कानउघाडणी करण्यात आली होती. उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्यांची झाडाझडती झाल्यानंतर जिल्हा प्रशासन कामाला लागले असून, अवघ्या सव्वा महिन्यात पुण्यात एक लाख मतदारांची भर पडली आहे. यामध्ये २८ आणि २६ हजार मतदार अनुक्रमे पुणे आणि बारामती लोकसभा मतदारसंघात वाढले आहेत.




#### अधिकाऱ्यांची खरडपट्टी

महायुतीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण केल्यानंतर त्यांना तीन टक्के मतांचा फटका बसल्याचे स्पष्ट झाले. प्रत्येक बुथवर किमान २५ मते जरी वाढली असती, तरी त्यांना इतका मोठा फटका बसला नसता, अशी कारणमीमांसा या नेत्यांनी केली आहे. हा फटका बसण्यात मतदारयाद्यांमधून मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे कमी झाल्याचाही दाखला देण्यात आला. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची गेल्या महिन्यांत आमदारांसमोर चांगलीच खरडपट्टी काढली होती. या वेळी फडणवीस यांनी मतदारयाद्या तुमच्या कार्यालयासमोर आणून जाळायच्या का, असाही संताप व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले. या खरडपट्टीनंतर जिल्हा प्रशासन कामाला लागले आणि त्यांनी अवघ्या सव्वा महिन्यात एक लाख मतदारांची नव्याने नोंदणी केली आहे.


> “ पुणे शहर जिल्ह्यात २५ जूनपासून झालेल्या मतदार नोंदणी एक लाखांहून अधिक मतदारांची भर पडली आहे. त्यामुळे मतदारांना येत्या २० ऑगस्टपर्यंत नाव नोंदविण्याची मुदत आहे; तसेच कृष्णधवल कार्ड असणाऱ्यांनी यादीत नाव समाविष्ट करून घेण्यासाठी अर्ज करावे.
>
> **- मीनल कळसकर,** उपजिल्हा निवडणूक अधिकारी.

# दहावी, बारावीची परीक्षा यंदा लवकर!

## यंदा आठ ते दहा दिवस लवकरच घेतल्या जाणार आहेत

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा दरवर्षीच्या तुलनेत यंदा आठ ते दहा दिवस लवकरच घेतल्या जाणार आहेत.**



त्यासाठी संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च, तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परीक्षांच्या तारखांबाबत हरकती, सूचना मांडण्यासाठी २३ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी संभाव्य वेळापत्रक प्रसिद्धिपत्रकाद्वारे जाहीर केले. नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीची परीक्षा घेतली जाते. त्यानुसार बारावीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, तर दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होते. तर बारावीचा निकाल मे अखेरीस, दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केला जातो. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीची पुरवणी परीक्षा, श्रेणीसुधार परीक्षा जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होते. पुढील शैक्षणिक वर्षाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळणे, पुरवणी परीक्षा लवकर घेऊन निकाल जाहीर करणे या दृष्टीने आता वर्षानुवर्षे प्रचलित वेळापत्रकात बदल करून परीक्षा लवकर घेण्याचे नियोजन राज्य मंडळाने केले आहे. यंदा दहावीच्या निकालावेळी राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी या बदलांसंदर्भात सूतोवाचही केले होते.राज्य मंडळाने जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार बारावीची तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत, लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान घेण्यात येणार आहे. तर दहावीची तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत आणि लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या दरम्यान घेण्याचे नियोजन आहे. शाळा-कनिष्ठ महाविद्यालये, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्यासाठी संभाव्य तारखा जाहीर करण्यात आले आहे. विषयवार सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईसंभाव्य वेळापत्रक प्रसिद्धिपत्रकाद्वारे जाहीर केले. नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीची परीक्षा घेतली जाते. त्यानुसार बारावीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, तर दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होते. तर बारावीचा निकाल मे अखेरीस, दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केला जातो. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीची पुरवणी परीक्षा, श्रेणीसुधार परीक्षा जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होते. पुढील शैक्षणिक वर्षाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळणे, पुरवणी परीक्षा लवकर घेऊन निकाल जाहीर करणे या दृष्टीने आता वर्षानुवर्षे प्रचलित वेळापत्रकात बदल करून परीक्षा लवकर घेण्याचे नियोजन राज्य मंडळाने केले आहे. यंदा दहावीच्या निकालावेळी राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी या बदलांसंदर्भात सूतोवाचही केले होते.राज्य मंडळाने जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार बारावीची तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत, लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान घेण्यात येणार आहे.

### संभाव्य तारखा जाहीर

तर दहावीची तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत आणि लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या दरम्यान घेण्याचे नियोजन आहे. शाळा-कनिष्ठ महाविद्यालये, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्यासाठी संभाव्य तारखा जाहीर करण्यात आले आहे. विषयवार सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.संकेतस्थळावर पाठवण्याबाबत राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.

# आरआयटी महाविद्यालयाच्या आवारात बिबट्याचा वावर

## अग्निशमन पथकाची शोध घेण्यास धावाधाव, परिसरात घबराट

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोहगाव-वडगाव शिंदे रस्त्यावरील आरआयटी महाविद्यालयाच्या आवारात बिबट्याचा वावर असल्याचे उघडकीस आले. सोमवारी सकाळी महाविद्यालयाच्या आवारात बिबट्या असल्याचे लक्षात आल्यानंतर घबराट उडाली.**



या घटनेची माहिती मिळताच वनविभाग, तसेच अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन बिबट्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.महाविद्यालयाच्या परिसरात दाट झाडी आहे. वडगाव शिंदे गावाजवळ इंद्रायणी नदी आहे. इंद्रायणी नदीपात्रातून बिबट्या महाविद्यालयाच्या परिसरात आल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या आवारात बिबट्या असल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. शोधमोहिमेसाठी अग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. अग्निशमन दल आणि वनविभागाच्या पथकाकडून आरआयटी महाविद्यालयाच्या परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. बिबट्याचा शोध लागलेला नाही, अशी माहिती अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख सुभाष जाधव यांनी दिली. लोहगाव-वडगाव शिंदे रस्त्यावरील आरआयटी महाविद्यालयाच्या आवारात बिबट्याचा वावर असल्याचे उघडकीस आले. सोमवारी सकाळी महाविद्यालयाच्या आवारात बिबट्या असल्याचे लक्षात आल्यानंतर घबराट उडाली.

### परिसरात शोधमोहीम

या घटनेची माहिती मिळताच वनविभाग, तसेच अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन बिबट्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.महाविद्यालयाच्या परिसरात दाट झाडी आहे. वडगाव शिंदे गावाजवळ इंद्रायणी नदी आहे. इंद्रायणी नदीपात्रातून बिबट्या महाविद्यालयाच्या परिसरात आल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या आवारात बिबट्या असल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. शोधमोहिमेसाठी अग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. अग्निशमन दल आणि वनविभागाच्या पथकाकडून आरआयटी महाविद्यालयाच्या परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली.

## खासदार अमोल कोल्हे यांचे एक 'स्टेटमेंट'

# अन् महाविकास आघाडीचा 'सेल्फ गोल'!

## लंडनमधील 200 कोटींच्या हॉटेलचा आरोप भोसरीकरांच्या जिव्हारी

### पक्षीय राजकारणात गाववाले मंडळींचा स्वाभिमान दुखावल्याची भावना

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमधील भोसरी विधानसभा मतदार संघातील राजकीय वातावरण तापले आहे. आरोप-प्रत्यारोपांची 'सोशल मीडिया'वर धुरळा सुरू असतानाच महाविकास आघाडीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या एका वक्तव्यामुळे मविआचा 'सेल्फ गोल' झाला आहे.**




सध्या अजित पवार गटात असल्याचा दावा करणारे माजी आमदार विलास लांडे यांच्या शैक्षणिक संस्थेसमोरील रस्त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाची 'शिव स्वराज्य' सभा झाली. ही सभा "महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची" असल्याचा दावा सेलिब्रिटी प्रचारप्रमुख खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि पक्षाने दावा केला. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी काढलेल्या यात्रेत आणि सभेत मात्र भोसरीकर किंबहुना पिंपरी-चिंचवडकरांचा स्वाभिमान दुखावल्याची भावना निर्माण झाली आहे. "भोसरीतील एका प्रतिष्ठित व्यक्तीचे लंडनमध्ये २०० कोटी रुपयांचे हॉटेल आहे.." असा जाहीर आरोप करीत हा पैसा कुठून आला... असा अप्रत्यक्ष सवाल खासदार कोल्हे यांनी जाहीरपणे उपस्थित केला. आरोपाचा रोख निश्चितच आमदार महेश लांडगे यांच्याकडे होता. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आणि लांडगे यांचे हॉटेल आहे किंवा नाही? याबाबत शहरात चर्चा सुरू झाली.

वास्तविक, पिंपरी-चिंचवडची राजकीय वाटचाल पाहता शहरातील गावकी-भावकी आणि स्थानिक राजकारणामध्ये शहराबाहेरील किंवा राज्याच्या नेतृत्त्वाने अवास्तव लक्ष घातले की स्थानिक भूमिपुत्र चमत्कारिक रित्या पक्षभेद विसरुन एक होतात, ही वस्तुस्थिती आहे. प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यापासून अगदी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत अनेक नेतृत्त्वांना हा अनुभव आला आहे. स्थानिक अस्मितेला हात घातला की, भूमिपुत्रांमधील स्वामिमान जागा होतो. "नको बारामती... नको भानामती.. आता पिंपरी-चिंचवडची धुरा राम-लक्ष्मणाच्या हाती" ही २०१७ मध्ये झालेली गर्जना त्याचे मूर्तरुप होती.

आगामी किमान २५ वर्षेतरी पिंपरी-चिंचवडचे राजकारण गावकी-भावकी आणि भूमिपुत्रांच्या अवती-भवतीच फिरेल, असे राजकीय जाणकार सांगतात. मध्यंतरी, महाविकास आघाडीकडून इच्छुक असलेले अजित गव्हाणे यांनी "भोसरीचा बकालपणा वाढला... भोसरीत राहणाऱ्या युवकांना नोकरी दिली जात नाही.. भोसरी बदनाम झाली आहे..." अशी टीका जाहीरपणे केली होती. त्यावेळीसुद्धा स्थानिक प्रतिष्ठीत व्यक्तींना ही बाब रुचलेली नाही. याबाबत त्यांनी खासगीमध्ये "राजकारणापायी भोसरीचे किंवा शहराचे नाव बदनाम करु नका.." असा सबुरीचा सल्लाही दिल्याचे सांगितले जाते. याउलट, आतापर्यंत माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, स्व. आमदार लक्ष्मण जगताप, माजी आमदार विलास लांडे यांच्यानंतर दुसऱ्या फळीत कोणताही स्थानिक नेत्याने राजकीय आरोप-प्रत्यारोप करताना गाववाल्यांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचेल, असे वक्तव्य केलेले नाही. खासदार अमोल कोल्हेंच्या वक्तव्यामुळे "आता बात भोसरीकरांच्या धंदा-पाण्यावर आणि स्वाभिमानावर आली..." त्यामुळे सर्वपक्षीय गाववाले यांच्यात नाराजीचा सूर असून, त्याचा फटका




### मावळ लोकसभा मतदार संघाची 'केस स्टडी'...

यासाठी मावळ लोकसभा निवडणूक २०१९ मधील दाखला पुरेसा आहे. २०१९ मध्ये तत्कालीन एकत्रित राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांनी मावळची निवडणूक लढवली. संपूर्ण राज्यातील नेते पार्थ यांच्या प्रचारासाठी मावळात ठाण मांडून होते. शिवसेनेचे विरोधी उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विरोधात टीकेची झोड आणि सोशल मीडियात रान पेटवले होते. त्यावेळी राष्ट्रवादीची ताकद असतानाही निवडणुकीत पराभव झाला. कारण, एकटी पडलेल्या श्रीरंग बारणेंसाठी पिंपरी-चिंचवडच्या स्थानिक भूमिपुत्रांनी पक्षभेद विसरून वज्रमूठ बांधली होती. बारणे विजयी झाले... बलाढ्य राष्ट्रवादीला केवळ स्थानिक आणि बाहेरचा या मुद्यावर पराभव पत्करावा लागला. सध्याची परिस्थिती पाहता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहीत पवार अशा राज्यस्तरीय नेत्यांनी आमदार महेश लांडगे यांना टार्गेट केले आहे. किंबहुना, लांडगे यांचा एकप्रकारे राजकीय अभिमन्यू केल्यासारखी स्थिती आहे. "या लढाईत महाविकास आघाडीचा उमेदवार जिंकवायचा नाही, तर पिंपरी-चिंचवडच्या महेश लांडगेंना हारवायचे आहे..." असा संदेश पिंपरी-चिंचवडकरांमध्ये गेला आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या स्वाभिमानाला हात घातल्यामुळे महेश लांडगेंच्या पाठिशी सध्या सहानुभूतीचे कवच निर्माण होवू लागले आहे.

### अमोल कोल्हेंचा वार, महेश लांडगेंचा पलटवार...!

"भोसरीतील प्रतिष्ठीत व्यक्तीचे लंडनमध्ये २०० कोटींचे हॉटेल आहे" असा आरोप मविआचे खासदार अमोल कोल्हे यांनी जाहीरपणे केला. त्यांचा रोख आमदार महेश लांडगे यांच्याकडेच होता. यावर लांडगे यांनी मोजक्या शब्दांत 'चेकमेट' केला. आमदार महेश लांडगे म्हणाले की, "एखाद्या भोसरीकराचे किंवा पिंपरी-चिंचवडकराचे २०० कोटीचे हॉटेल लंडनमध्ये असेल, तर ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. खासदार साहेबांचा रोख माझ्याकडे असेल... तर त्यांनी पुराव्यानिशी सिद्ध करावे. मी आजच्या आज राजकारणातून निवृत्ती घेतो... पदाचा राजीनामा देतो... पण, केलेले आरोप सिद्ध करता आले नाहीत, तर खासदार काय करणार हेसुद्धा त्यांनी जाहीर करावे." त्यामुळे खासदार कोल्हे यांना केलेल्या आरोपाची सिद्धता द्यावी लागणार हे निश्चित झाले. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीत अमोल कोल्हे यांना भोसरीमध्ये सुमारे १० हजार मते कमी आहेत. या निवडणुकीच्या प्रचारात एकदाही आम्ही कोल्हेंवर टीका केली नाही. मी माझ्या नेत्यांचे विचार मांडत होतो. महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार केला. त्यामुळे निवडणूक विकासाच्या मुद्यावर आणि आपण सत्तेत असताना का प्रश्न सोडवले नाही? अशा अजेंड्यावर व्हावी, असे सूचक संदेशही लांडगे यांनी एका मुलाखतीमध्ये बोलताना दिला आहे.

---

## 'कानबाई' उत्सवातून घडले खान्देशच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन

### केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांचे प्रतिपादन

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

कानबाई उत्सव हा खान्देशातील प्रमुख उत्सव आहे. जात, पात, धर्म बाजूला ठेवून हा उत्सव साजरा केला जातो. खान्देशात पिढ्यानपिढ्यापासून हा उत्सव सुरु आहे. सासू सुनेला, आई आपल्या मुलीला या उत्सवाबद्दल सांगत परंपरा पुढे नेण्याचा सल्ला देत असून, 'कानबाई' उत्सवातून खान्देशच्या सांस्कृती-परंपरेचे दर्शन घडत असते. वडीलधाऱ्यांकडून मिळालेला हा वारसा पुढे नेण्याचे काम पिंपरी चिंचवड सारख्या औद्योगिक नगरीत सुरू असल्याचा एक खान्देशी म्हणून अभिमान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी केले. खान्देश कानबाई माता उत्सव समिती, पिंपरी चिंचवड शहर यांच्यावतीने खान्देशातील




संस्कृती, परंपरा आणि धार्मिक सण पुढील पिढयांसाठी प्रेरणा आणि वारसा अखंडीत ठेवण्यासाठी दोन दिवसीय खान्देश दैवत माय कानबाई माता उत्सवाचे पिंपरी चिंचवड शहरामध्ये आयोजन करण्यात आले होते.

### मान्यवरांची उपस्थिती...

खासदार श्रीरंग आप्पा बारणे, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार उमा खापरे, विजय शेठ जगताप, कार्यक्रमाचे संयोजक माजी सत्तारुढ पक्षनेता नामदेव ढाके, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, मिलींद चौधरी, हेमंत झोपे, काळूराम बारणे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, नगरसेवक राजेंद्र गावडे, सूरेश भोईर, अभिषेक बारणे, सागर आंगोळकर, हर्षल ढोरे, शारदाताई सोनवणे, राजू दूर्गे, शेखर चिंचवडे, ऍड. गोरक्षनाथ झोळ, अनिल चौधरी, आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'नीट'चा निवाडा आणि लोकहित




**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरही, वैद्यकीय प्रवेशाच्या 'नीट' परीक्षेतील 'परीक्षापद्धतीतील व्यवस्थात्मक दोष' हा मुद्दा शिल्लक राहतो. त्याची उकल करताना केंद्रीकरणाचा हव्यास किती/कुठवर धरायचा या प्रश्नालाही भिडावे लागेल...**

'नीट परीक्षा घोटाळ्या'बाबत सर्वोच्च न्यायालयाने नुकताच अंतिम निर्णय दिला. 'नीट'ची फेरपरीक्षा होणार नाही! त्यामुळे सुमारे २३ लाख परीक्षार्थींची फरपट तरी थांबली. 'नीट'बाबत सुमारे ४० वेगवेगळ्या याचिका दाखल झाल्या; ज्यात दोन मुख्य आरोप केले गेले. एक म्हणजे नीट परीक्षेचा पेपर आधीच फुटला होता आणि दुसरा- ही परीक्षा घेणाऱ्या 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एनटीए) या केंद्रीय संस्थेच्या परीक्षा कार्यपद्धतीतच मोठे व्यवस्थात्मक दोष असल्यामुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेस तडा गेला आहे. याचिकांतील मागणी फेटाळली गेली, पण विश्वासार्हतेचा प्रश्न उरला आहे. याचिकांमधील आरोपांचे रूपांतर खंडपीठाने तीन प्रश्न व त्यांची शहानिशा यात केले : (१) नीट परीक्षेचा पेपर खरोखर फुटला का? आणि परीक्षा घेताना व्यवस्थात्मक घोटाळा झाला आहे का? (२) हा घोटाळा संपूर्ण नीट परीक्षेवरच परिणाम करणारा आहे का? (३) या घोटाळ्यातील लाभार्थी शोधणे शक्य आहे का? खंडपीठाचे




लक्ष मुख्यत: हजारीबाग येथे घडलेला घोटाळा, त्याचा तपशील व आवाका यावर केंद्रित राहिले. यात केंद्र शासनाच्या सीबीआय, इतर तपास यंत्रणा आणि एनटीए यांनी बाजू मांडली. या वर्षीचा व गेल्या दोन वर्षांच्या निकालाचा संपूर्ण डेटा 'आयआयटी मद्रास'कडे सोपवून, संभाव्य पेपरफुटीचा निष्कर्ष आणि त्याचा आवाका याबद्दल अहवाल मागविण्यात आला. त्यांचा अहवाल, "निदान डेटाच्या विश्लेषणातून पेपर फुटल्याचे दिसून येत नाही" असा होता. या दोन्ही गोष्टींच्या आधारे खंडपीठाने निर्णय दिला की, जरी पेपर फुटल्याचे सिद्ध झाले असले तरी त्याचा आवाका हा तपास यंत्रणेने म्हटल्याप्रमाणे फक्त १५५ लाभार्थींपुरताच मर्यादित आहे. याचबरोबर 'संपूर्ण परीक्षेची विश्वासार्हता व्यापक प्रमाणावर भंग झाल्याचे ठोस पुरावे नाहीत,' असे न्यायालयाने म्हटले. पुनर्परीक्षा घेणे हे २० लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे नुकसान करणारे ठरेल, एवढेच नाही तर भविष्यात गुणवत्तावान डॉक्टर्सची उपलब्धता यामुळे धोक्यात येईल! न्यायालयाचा ६३-पानी निर्णय, त्याचा मसुदा आणि प्रकरणामधून प्राप्त झालेली माहिती यांचे विश्लेषण हे सार्वजनिक लोकहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. याच्या प्राथमिक अभ्यासातून काही प्रश्न उपस्थित होतात. याचिकांमधला पेपरफुटीचा दावा हा मान्य केला गेला; परंतु 'परीक्षापद्धतीतील व्यवस्थात्मक दोष' हा मुद्दा दुर्लक्षित राहतो. सीबीआयकडून मिळालेले पुरावे सांगतात की, हजारीबाग, गोध्रा, लातूर, इ. ठिकाणी जे घोटाळे झाले त्यांत पर्यवेक्षक, शहर समन्वयक आणि 'एनटीए'ने नेमलेल्या अधिकृत व्यक्ती सहभागी होत्या. प्रत्यक्ष घोटाळा एनटीएच्या अंतर्गत यंत्रणेला लक्षात येण्याऐवजी बाह्य संस्था वा प्रसिद्धी माध्यमांतून लक्षात आला. देशभरातल्या अन्य परीक्षा केंद्रांवर असे प्रकार झाले आहेत का हे तपासण्यासाठी एनटीए वा सीबीआयने नेमक्या काय हालचाली केल्या याबाबतही निश्चित माहिती मिळालेली नाही. त्यामुळे 'परीक्षापद्धतीतील व्यवस्थात्मक दोष' हा मुद्दा पुरेसा गांभीर्याने घेतलेला नाही हे स्पष्टपणे दिसते. एनटीएच्या कार्यपद्धतीचा अभ्यास आणि सुधारणा सुचवण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे न्यायालयीन निर्णयात म्हटले आहे. ती प्रत्यक्षात काय करील हा निराळा मुद्दा आयआयटी मद्रासकडून जो गेल्या तीन वर्षांच्या नीटच्या निकालांचा अभ्यास केला गेला तोही अनेक दृष्टींनी सदोष आढळतो. आयआयटीला या अभ्यासासाठी एनटीएचीही मदत होती. आयआयटीचा अहवाल हा घाईघाईने केलेला आणि अनेक चुकीचे दाखले असलेला दिसतो. ज्या सांख्यिकीय साधनाच्या आधारे परीक्षापद्धती निर्दोष आहे हे सिद्ध केले गेले तो 'बेल कर्व्ह' हा २०२४ आणि २०२३ या वर्षांसाठी वेगवेगळा आहे. २०२४ च्या माहिती विश्लेषणातून असे आढळते की 'नीट' परीक्षा ही उच्च गुण असलेल्या विद्यार्थ्यांना सारख्याच प्रमाणात सोपी नव्हती. शिवाय, शहरनिहाय आणि केंद्रनिहाय असलेली सांख्यिकीय माहिती ही 'बेल कर्व्ह' स्वरूपात प्रत्यक्षात नाही.

## प्रासंगिक »

### संशयकल्लोळ

***नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी-बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक.***

'हिंडेनबर्ग' या अमेरिकी गुंतवणूकदार कंपनीने आपल्या नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी-बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक. भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' म्हणजे 'सेबी' आणि तिच्या प्रमुखांविषयीचे 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप संबंधित यंत्रणांस परेशान तर करतीलच; पण गुंतवणूकदारांच्या मनांत गोंधळ वाढवतील. ते ज्या कंपनीशी संबंधित आहेत त्या कंपनीच्या समभागांचे सोमवारी जे काही झाले त्यावरून हा गोंधळ किती गंभीर असू शकतो हे कळेल. याआधी साधारण दीड वर्षांपूर्वी या हिंडेनबर्गने सध्या पंचमहाभूतांस कवेत घेणाऱ्या अदानी समूहावर आरोप केले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन चौकशी समित्याही नेमाव्या लागल्या.

**राष्ट्रवादाच्या बेटकुळ्या फुगवणे कधीतरी थांबवावे लागतेच. ज्या देशाशी आपण संघर्षाच्या आणि सडेतोड प्रत्युत्तराच्या भाषेत बोलतो, त्या चीनबरोबर आपली व्यापारी तूट दिवसेंदिवस वाढतच आहे. म्हणजे चीनकडून होणारी आयात कमी होत नाही आणि आपण त्या देशाला त्या प्रमाणात निर्यात करू शकत नाही.**

# मालदीवमधील आश्वासक वारे...

ही आयात सरसकट थांबवणे शक्य नाही आणि निर्यात वाढवण्याची आपली सध्या क्षमता नाही. तेव्हा व्यापार थांबवणे वगैरे बातच नको. फुटकळ उपयोजनांवर दर सहा महिन्यांनी बंदी घालून आपण राष्ट्रवादाची हौस तेवढी जिरवून घेतो. याचे कारण, चिनी मालाला सशक्त पर्याय शोधणे आपल्याला जमत नाही आणि या मालावाचून आपली औद्योगिक आणि पायाभूत दौड मंदावते हे वास्तव त्यामुळे स्वीकारावे लागते. असेच काहीसे सध्या भारत आणि मालदीव यांच्यातील संबंधांबाबत होत आहे. त्या देशाचे अध्यक्ष मोहम्मद मुईझ्झू यांनी गतवर्षी निवडून आल्यानंतर भारतास डिवचण्यास सुरुवात केली. त्यांना चीनची फूस होती हे तर उघडच आहे. त्यांच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी त्याहीपुढे जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही चिखलफेक केली. कारण काय, तर पंतप्रधानांनी लक्षद्वीपमधील पर्यटनास प्रोत्साहनपर भेट दिली. मुईझ्झूंच्या मंत्र्यांच्या वेडगळपणाला खरे तर अध्यक्षांनीच आवर घालायला



हवा होता. तो घातला तोवर उशीर झाला होता. याचा एक परिणाम म्हणजे मालदीवमधील पर्यटनावर बंदी घालण्याची मोहीम इथल्यांनी सुरू केली. अशा प्रकारच्या भावनिक मोहिमांचे समर्थन होऊ शकत नाही. पण भारतीय पर्यटकांची संख्या घटली तर काय हाहाकार उडू शकतो याची जाणीव मुईझ्झूंना पर्यटन हंगाम संपल्यावर झाली असावी. जून महिन्यात मुईझ्झू अध्यक्ष या नात्याने पहिल्यांदाच भारतात आले. पंतप्रधान मोदींच्या शपथविधीसाठी ते विशेष निमंत्रित होते. त्यानंतर आता परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर त्या देशाच्या दौऱ्यावरून नुकतेच परतले. दोन्ही देशांतील संबंध त्यामुळे पुन्हा सुरळीत होत आहेत का, याचा धांडोळा या निमित्ताने घ्यावा लागेल. 'इंडिया आउट' हा मुईझ्झू यांचा गतवर्षी प्रचारातील मुद्दा होता. मालदीवमध्ये तैनात भारतीय हवाईदलाचे मालवाहू विमान, हेलिकॉप्टर आणि काही सैनिक यांना तो देश सोडून जाण्यास मुईझ्झू यांनी भाग पाडले. त्यांनी अध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदा चीनला भेट दिली. एकंदर आविर्भाव असा होता, की येथून पुढे मालदीवला भारताची गरजच भासणार नाही आणि चीन त्या देशाच्या साऱ्या गरजा पुरवू शकेल. चीनने एक अत्यंत आधुनिक युद्धनौका मालदीवच्या किनाऱ्यावर नांगरून ठेवली आणि त्या देशाबरोबर लष्करी सहकार्याच्या करारावरही चर्चा सुरू केली. परंतु भारत-मालदीव संबंधांना प्रदीर्घ सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक अधिष्ठान आहे, हे वास्तव एखाद्या सरकारला अल्प काळात बदलता येणार नाही. नैसर्गिक आपत्ती वा कोविडसारखे साथीचे आजार बळावल्यास भारताचीच मदत या देशाला घ्यावी लागते. तेथे चीन येणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल!

## » उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची खोचक टीका!

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात जर पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर त्याचे सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल, अशी खोचक टीका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीबाबत कुठेही सहानुभूती नसून काही लोकांद्वारे केवळ सहानुभूतीचा डंका वाजवला जातो आहे, असे ते म्हणाले.**



देवेंद्र फडणवीस यांनी आज 'मुंबई तक' या वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फुटण्याबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना त्यांनी शरद पवार यांच्यावर खोचक शब्दांत टीका केली.मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून आलो, असं मी एकदाच बोललो होतो. आणि तेही गंमतीने बोललो होते. खरं तर अशाप्रकारे कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. दोन्ही पक्षा त्या त्या पक्षांतील नेत्यांमुळे फुटले. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेत आणि अजित पवार यांना राष्ट्रवादीत त्यांचे भविष्य दिसत नसल्याने ते पक्षातून बाहेर पडले", अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी शरद पवार यांनाही लक्ष्य केलं."मुळात शरद पवार यांनी आतापर्यंत सगळ्यात जास्त पक्ष फोडले. पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवार यांना सुवर्णपदक मिळेल", असा टोला त्यांनी लगावला.पुढे बोलताना, "लोकसभ निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असं वाटत नाही. फक्त माध्यमांतील काही लोकांनाच त्यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचं वाटतं. तेच लोक सतत सहानुभूतीचा डंका वाजतवत असतात", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच "राज्यात त्यांच्याबद्दल सहानुभूती असती, तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनी जिंकली नसती. ती जागा त्यांनी मतांचं ध्रुवीकरण करून जिंकली", असेही ते म्हणाले.लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि त्याचं श्रेय त्यांना द्यावंच लागेल. कुठे सरकारविरोधात वातावरण आहे, त्याचा अभ्यास करूनच त्यांनी जागा लढवल्या. विधानसभा निवडणुकीतही ते कमी आणि मोजक्याच जागा लढवतील, असं वाटतं", असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.देवेंद्र फडणवीस यांनी आज 'मुंबई तक' या वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादी

### सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल

लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि त्याचं श्रेय त्यांना द्यावंच लागेल. कुठे सरकारविरोधात वातावरण आहे, त्याचा अभ्यास करूनच त्यांनी जागा लढवल्या. विधानसभा निवडणुकीतही ते कमी आणि मोजक्याच जागा लढवतील, असं वाटतं", असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.देशात जर पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर त्याचे सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल, अशी खोचक टीका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

काँग्रेस हे दोन पक्ष फुटण्याबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना त्यांनी शरद पवार यांच्यावर खोचक शब्दांत टीका केली.मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून आलो, असं मी एकदाच बोललो होतो. आणि तेही गंमतीने बोललो होते. खरं तर अशाप्रकारे कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. दोन्ही पक्षा त्या त्या पक्षांतील नेत्यांमुळे फुटले. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेत आणि अजित पवार यांना राष्ट्रवादीत त्यांचे भविष्य दिसत नसल्याने ते पक्षातून बाहेर पडले", अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी शरद पवार यांनाही लक्ष्य केलं."मुळात शरद पवार यांनी आतापर्यंत सगळ्यात जास्त पक्ष फोडले. पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवार यांना सुवर्णपदक मिळेल", असा टोला त्यांनी लगावला.पुढे बोलताना, "लोकसभ निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असं वाटत नाही. फक्त माध्यमांतील काही लोकांनाच त्यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचं वाटतं. तेच लोक सतत सहानुभूतीचा डंका वाजतवत असतात", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच "राज्यात त्यांच्याबद्दल सहानुभूती असती, तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनी जिंकली नसती. ती जागा त्यांनी मतांचं ध्रुवीकरण करून जिंकली.

# एकनाथ शिंदेंनाही अडकवण्याचा प्रयत्न झाला

## » परमबीर सिंग यांच्या दाव्यावर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अडकवण्याचा महाविकास आघाडी सरकारचा डाव होता, असा खळबळजनक आरोप मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी केला आहे. त्यांच्या या विधानावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली असून त्यांनीही हा दावा खरा असल्याचं म्हटलंय. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली.**

देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात होते. गिरीश महाजन विरोधी पक्षात होते. विरोधी पक्षाला अडचणीत, गोत्यात आणणं, खोट्या केसेस दाखल करणं हे मी एकवेळ समजू शकतो. पण मी तर त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी होतो. पण माझ्याही बाबतीत असा प्रयत्न केला गेला. याबाबत मी योग्येवेळी सांगेन. प्रकरणात अडकवण्याचा आणि खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. मी यावर सविस्तर बोलणार आहे.महायुतीचं सरकार स्थापन झालं, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले आहेत हे त्यांना पचत नाही. ते सांगत होते की सरकार पडेल, पण सरकार मजबुतीने उभं आहे. घटनाबाह्य मुख्यमंत्री म्हणणारे योजनेचे फॉर्म कसे भरतात? हे



दुट्टपी आहेत. यांना काही देणं घेणं नाही. यांना फक्त घेणं माहितीय, देणं माहीत नाही", असंही ते म्हणाले.मराठा आरक्षणावर तोडगा काढण्याठी सर्व पक्षीय बैठक आम्ही बोलावली होती. पण कोणीही आले नाही. दुर्दैवाने राज्यात दोन समाजांमध्ये जे सुरू आहे ते थांबले पाहिजे अशी माझी प्रामाणिक भूमिका आहे. याबाबत शरद पवार मला भेटले तेव्हा मी त्यांना सांगितलं की राज्यात यापूर्वी कधीही असं पाहायला मिळालं नव्हते. महाराष्ट्राची जी काही परंपरा आहे त्याला बाधा येता कामा नये. माझी चर्चा झाली आहे जे काही करावं लागे इतकच त्यांनी तर त्यांनी ठाण्यातील एका जुन्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात तत्कालिन विरोधी पक्षनेते आणि आताचे देवेंद्र फडणवीस यांनाही अटक करण्याचा प्रयत्न केला.

### फडणवीस यांना अटक करण्याचा प्रयत्न

याप्रकरणाची चौकशी तेव्हाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सरदार पाटील यांनी केली होती. त्यांना थेट संजय पांडे यांच्याकडून निर्देश मिळत होते. तर संजय पांडे यांना अनिल देशमुख, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून निर्देश दिले जात होते. त्याप्रकरणात केवळ मलाच नाही तर देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्याचा प्रयत्न झाला", असेही त्यांनी सांगितले. याशिवाय आश्चर्याची बाब म्हणजे याच प्रकरणात तत्कालिन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनाही अडकवण्याचा प्रयत्न झाला. त्यांना अटक करण्यासाठी संजय पांडे यांनी सरदार पाटील यांना निर्देश दिले होते.

# बाजाराच्या तेजीवर राहुल गांधींची शंका!

## मागच्या पाच महिन्यात स्वतः कमावले ‘इतके’ पैसे



। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या शेअर बाजारात फुगवटा आणला गेला आहे, असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे केंद्र सरकारवर करतात. मात्र मागच्या पाच महिन्यात त्यांच्या स्वतःच्या शेअर्समध्ये चांगलीच वाढ झाल्याचे समोर आले आहे. आयएनएस (IANS) वृत्तसंस्थेने याबाबतचे वृत्त दिले आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी केलेल्या गुंतवणुकीसंदर्भात शपथपत्रात माहिती दिली होती. यावेळी त्यांनी कोणकोणत्या शेअर्समध्ये गुंतवणूक केली, याचीही माहिती दिली होती. या शेअर्सच्या दरात मागच्या पाच महिन्यात घसघशीत वाढ झाल्याचे समोर आले आहे.**

राहुल गांधी यांच्या शेअर बाजार पोर्टफोलियोची किंमत ४.३३ कोटींवरून (१५ मार्च २०२४) आता १२ ऑगस्ट २०२४ रोजी ४.८० कोटींवर पोहोचल्याचे आयएनएसच्या वृत्ताद्वारे समोर आले आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीच्या शपथपत्रात दिलेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे एशियन पेंट्स, बजाज फायनान्स, दीपक नायट्रेट, डिव्हिस लॅब्स, जीएमएम फॉडलर, हिंदुस्तान लिव्हर, इन्फोसिस, आयटीसी, टिसीएस, टायटन, ट्यूब इनव्हेस्टमेंट ऑफ इंडिया अशा काही कंपन्यांचे शेअर्स राहुल गांधी यांच्या पोर्टफोलियोमध्ये आहेत.राहुल गांधी यांच्या पोर्टफोलियोमध्ये सध्या २४ स्टॉक्स आहेत. त्यापैकी फक्त चार कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाल्यानंतर त्यांना तोटा झाला आहे. याव्यतिरिक्त व्हर्टोझ ॲडव्हरटायझिंग लि. आणि विनाइल केमिकल्स या छोट्या कंपन्याही त्यांच्या पोर्टफोलियोमध्ये आहेत.पंतप्रधान मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर शेअर बाजारात मोठी तेजी पाहायला मिळाली आहे. मागच्या काही महिन्यात सेन्सेक्स आणि निफ्टीने अनेक विक्रम मोडीत काढत विक्रमी उच्चांक गाठला आहे. दरम्यान हिंडेनबर्ग संस्थेने रविवारी सेबीच्या अध्यक्षांवर आरोप केल्यानंतर राहुल गांधी यांनी संयुक्त संसदीय समितीद्वारे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.“सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बुच (MADHAVI BUCH) यांनी अद्याप राजीनामा का दिला नाही? गुंतवणुकदारांनी कष्टाने कमावलेला पैसा गमावला तर कोणाला जबाबदार धरले जाईल? पंतप्रधान नरेंद्र मोदी (NARENDRA MODI), सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बुच की गौतम अदानी? जे नवीन आणि अत्यंत गंभीर आरोप समोर आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय (SUPREME COURT) पुन्हा एकदा या प्रकरणाची स्वत:हून दखल घेत चौकशी करेल का? आता हे स्पष्ट झाले आहे की, पंतप्रधान मोदी जेपीसी (संसदीय संयुक्त समीती) तपासाला इतके का घाबरले आहेत? त्यातून काय उघड होऊ शकते”, असे अनेक प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केले आहेत.राहुल गांधी यांच्या शेअर बाजार पोर्टफोलियोची किंमत ४.३३ कोटींवरून (१५ मार्च २०२४) आता १२ ऑगस्ट २०२४ रोजी ४.८० कोटींवर पोहोचल्याचे आयएनएसच्या वृत्ताद्वारे समोर आले आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीच्या शपथपत्रात दिलेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे एशियन पेंट्स, बजाज फायनान्स, दीपक नायट्रेट, डिव्हिस लॅब्स, जीएमएम फॉडलर, हिंदुस्तान लिव्हर, इन्फोसिस, आयटीसी, टिसीएस, टायटन, ट्यूब इनव्हेस्टमेंट ऑफ इंडिया अशा काही कंपन्यांचे शेअर्स राहुल गांधी यांच्या पोर्टफोलियोमध्ये आहेत.राहुल गांधी यांच्या पोर्टफोलियोमध्ये सध्या २४ स्टॉक्स आहेत. त्यापैकी फक्त चार कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाल्यानंतर त्यांना तोटा झाला आहे. याव्यतिरिक्त व्हर्टोझ ॲडव्हरटायझिंग लि. आणि विनाइल केमिकल्स या छोट्या कंपन्याही त्यांच्या पोर्टफोलियोमध्ये आहेत.तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर शेअर बाजारात मोठी तेजी पाहायला मिळाली आहे. मागच्या काही महिन्यात सेन्सेक्स आणि निफ्टीने अनेक विक्रम मोडीत काढत विक्रमी उच्चांक गाठला आहे.

### त्यातून काय उघड होऊ शकते

रविवारी सेबीच्या अध्यक्षांवर आरोप केल्यानंतर राहुल गांधी यांनी संयुक्त संसदीय समितीद्वारे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.“सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बुच (MADHAVI BUCH) यांनी अद्याप राजीनामा का दिला नाही? गुंतवणुकदारांनी कष्टाने कमावलेला पैसा गमावला तर कोणाला जबाबदार धरले जाईल? पंतप्रधान नरेंद्र मोदी (NARENDRA MODI), सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बुच की गौतम अदानी? जे नवीन आणि अत्यंत गंभीर आरोप समोर आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय (SUPREME COURT) पुन्हा एकदा या प्रकरणाची स्वत:हून दखल घेत चौकशी करेल का? आता हे स्पष्ट झाले आहे की, पंतप्रधान मोदी जेपीसी (संसदीय संयुक्त समीती) तपासाला इतके का घाबरले आहेत? त्यातून काय उघड होऊ शकते.

# उत्तर भारतात पूर आणि भूस्खलनाचा कहर

## 28 जणांचा मृत्यू, दिल्लीमध्ये पावसाचा जोर वाढणार



। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज


**यंदाच्या मान्सूनमध्ये देशात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत आहे. उत्तर भारतात अनेक राज्यांमध्ये उशिरा का होईना पण पावसाने हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी मुसळधार पावसाच्या कहराने जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी ढगफुटी झाल्याने मोठा पूर आला तर काही ठिकाणी भूस्खलन झाल्याचेही पाहायला मिळाले आहे.**

केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलनामुळे ३०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच आता उत्तर भारतात विविध ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसाने किमान २८ जणांचा बळी घेतला आहे. राजस्थानमध्ये जोरदार पावसामुळे भूस्खलन होऊन नागरिकांच्या घरांची पडझड झाली. दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन सध्या राज्यात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये काल (११ ऑगस्ट) रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये २८ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. मुख्यतः उत्तर आणि वायव्य भारतात हा मुसळधार पाऊस कोसळला. वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाले. त्यामुळे लोकांची घरे, वाहने वाहून गेली. झाडांची मोठी पडझड झाली तसेच सगळीकडे एकच हाहाकार उडाला. राजस्थानला या पावसाचा मोठा फटका बसला आहे. शनिवार,दिवस राज्यामध्ये जोरदार पाऊस कोसळत होता. या दोन दिवसांमध्ये पावसामुळे उद्भवलेल्या विविध घटनांमध्ये एकूण १६ जणांचा मृत्यू झाला.

### भजनलाल शर्मा यांची प्रतिक्रिया

रविवारी, राजस्थानमधील करौली जिल्ह्यात ३८ सेमी इतक्या मुसळधार पावसाची नोंद हवामान विभागाने केली आहे. दरम्यान, “राजस्थानमधील नागरिकांच्या सुरक्षेला आम्ही प्रथम प्राधान्य देतो”, अशी प्रतिक्रिया राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सोशल मीडियावरून दिली आहे. तसेच मुख्यमंत्री कार्यालयामध्ये राज्यातील अतिवृष्टीबाबत अधिकाऱ्यांची बैठक घेतली असून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व व्यवस्था तातडीने पुरवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

# धनुषला व्हायचं शेफ



अभिनेता धनुष आज 40 वर्षांचा झाला आहे. शेफ बनण्याचे स्वप्न पाहणारा धनुष आपल्या भावाच्या सांगण्यावरून चित्रपटात आला आणि प्रसिद्ध झाला. इंडस्ट्रीतील सुपरस्टार रजनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या जेव्हा त्याच्या प्रेमात पडली तेव्हा धनुष साऊथ सिनेसृष्टीत छाप पाडत होता. आयुष्य बदलत राहिले आणि यश येत राहिले. वर्षभरापूर्वी, धनुष आपला मुलगा असल्याचा दावा करणारे जोडपे समोर आले होते. याच्या काही काळापूर्वी धनुषचे काही खासगी फोटोही लीक झाले होते, ज्यामुळे त्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याबाबत त्याला विचारणा केली असता त्याने एका टीव्ही चॅनलसाठी मुलाखत घेणाऱ्या तरुणीला खडसावले आणि लगेचच माईक काढून बाहेर निघून गेला.या व्यतिरिक्त धनुषने फोर्ब्सच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या स्टार्सच्या यादीत 6 वेळा स्थान मिळवले आहे. धनुषचे यूट्यूबवर अनेक रेकॉर्ड आहेत. धनुषचा जन्म 28 जुलै 1983 रोजी मद्रास येथे तामिळ चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माती कस्तुरी राजा यांच्या घरी झाला. त्यांचे नाव व्यंकटेश प्रभू कस्तुरी राजा होते. धनुषला नेहमीच शेफ बनायचे होते, त्यासाठी हॉटेल मॅनेजमेंट स्कूलमध्ये जाण्याचे त्याचे स्वप्न होते. धनुषच्या वडिलांच्या वाटेवर त्याचा मोठा भाऊही दिग्दर्शक झाला, त्यामुळे धनुषने शेफऐवजी अभिनेता व्हावे अशी त्यांची इच्छा होती. धनुषने मोठ्या भावाची आज्ञा मानून प्रवेश घेतला नाही. धनुषने वयाच्या 19 व्या वर्षी त्याच्या वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या थुल्लुवधो इल्लामई (2002) या तमिळ चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि त्याचे नाव व्यंकटेश बदलून धनुष ठेवले. धनुषने 1996 च्या कुरुथीपुनल चित्रपटात दाखविलेल्या ऑपरेशन धनुषपासून प्रेरणा घेऊन त्याचे स्क्रीन नाव ठेवले. धनुषचा पहिला चित्रपट 'थुल्लूवधो इल्लमाई' बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवू शकला नाही. या चित्रपटानंतर धनुषला ना कोणतीच ओळख मिळाली, ना त्याला इतर कोणत्याही चित्रपटाची ऑफर आली. अशा परिस्थितीत त्याचा मोठा भाऊ सेल्वाराघवन याने धनुषला त्याच्या दिग्दर्शकीय पदार्पण चित्रपट 'कढाल कोंडें' (2003) मध्ये कास्ट केले. धनुष एक दिवस कढाल कोंडेंसाठी शूटिंग करत होता. सेटवर काही लोक शूटिंग पाहण्यासाठी आले होते. धनुषला पाहताच त्यांनी जवळ येऊन विचारले की चित्रपटाचा नायक कोण आहे. त्यावेळी धनुषला स्वतःला हिरो म्हणवण्याचा आत्मविश्वास नव्हता. लोक त्याची चेष्टा करतील हे त्याला माहीत होते, म्हणून त्याने दुसऱ्या कास्ट सदस्याकडे बोट दाखवले. ते लोक हिरोला शोधू लागले तेव्हा कोणीतरी धनुषकडे बोट दाखवले. हे जाणून ते लोक जोरजोरात हसू लागले. धनुषकडे बोट दाखवत ते लोक म्हणाले, त्या ऑटोचालकाकडे बघ, तो हिरो आहे. ते लोक खूप मस्करी करत होते. हे पाहून धनुष गाडीतून पळून गेला आणि जोरजोरात रडू लागला. 19 वर्षांचा धनुष हा अपमान सहन करू शकला नाही कारण सगळे त्याची चेष्टा करायचे.

# माधुरीने चालवली बोट



माधुरी दीक्षित सध्या तिच्या कुटुंबासोबत सुट्टी साजरी करत आहे. अलीकडेच त्यांचे पती डॉ. श्रीराम नेने यांनी व्हेकेशन दरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. ज्यामध्ये 56 वर्षीय माधुरी इटलीच्या लेक कोमोमध्ये स्पीड बोट चालवताना दिसत आहे. स्वत: डॉ.नेने यांनी हा सेल्फी व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये माधुरी स्पीड बोट चालवत असून ते व्हिडिओ शूट करत आहेत. व्हिडिओमध्ये या दोघांसोबत त्यांच्या मुलाचीही झलक पाहायला मिळत आहे. व्हिडिओ शेअर करताना नेनेने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'जेव्हा बॉस गाडी चालवतो'. लुकबद्दल बोलायचे झाले तर माधुरी काळ्या टॉपसह हिरव्या पँटमध्ये दिसली, यासोबत तिने टॉपवर प्रिंटेड शर्ट घातला आहे, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. काळ्या गॉगलसह हा लूक पूर्ण केला आहे. तर तिचा नवरा काळ्या टी-शर्ट आणि सनग्लासमध्ये दिसत आहे. 'बॉस क्वीन टेक द व्हील' असे म्हणत चाहत्यांनी व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली. आणखी एका यूजरने लिहिले की, 'माधुरी एक सदाबहार सौंदर्य आहे.' तिसऱ्याने लिहिले, 'वाह, खूप सुंदर मॅडम आणि खूप सुंदर कुटुंब'. यावर टिप्पणी करताना, आणखी एका वापरकर्त्याने म्हटले – सुंदर व्हिडिओ, माधुरी दीक्षित आणि डॉ. नेने यांची जोडी नंबर 1 आहे. वर्क फ्रंटवर, माधुरी दीक्षित शेवटची 'द फेम गेम'मध्ये दिसली होती. ही एक वेब सीरिज होती जी ओटीटीवर रिलीज झाली होती, या शोमध्ये मानव कौल, संजय कपूर यांच्यासोबत मुख्य भूमिकेत होते. याशिवाय मजा मां हा चित्रपटही प्रदर्शित झाला आहे.

# सामंथाचा आइस बाथ




साऊथची सुपरस्टार सामंथा रुथ प्रभू हिने सध्या प्रकृतीच्या कारणास्तव अभिनय जगतापासून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री सध्या सुटी घेऊन बाली इंडोनेशियामध्ये सुट्टी साजरी करत आहे. समंथा तिच्या सोशल मीडियावर तिच्या व्हेकेशनमधील फोटो आणि व्हिडिओ सतत शेअर करत असते. तिने तिच्या इंस्टाग्रामवर आणखी एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती 4 डिग्री तापमानातआइस बाथ करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सामंथा बाथटबमध्ये बसली आहे. ती या बर्फाळ पाण्यात सतत 6 मिनिटे राहिली. आईस बाथ स्नायू दुखणे आणि सूज दूर करण्यासाठी खूप फायदेशीर आहे. हा व्हिडिओ पोस्ट करत सामंताने कॅप्शन दिले, '#ICEBATH 4 डिग्री 6 मिनिटे. सामंथाने तिच्या अलीकडील प्रोजेक्ट्स सिटाडेल आणि कुशीचे शूटिंग पूर्ण केल्यानंतर कामातून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री जवळजवळ एक वर्षापासून मायोसिटिस नावाच्या ऑटोइम्यून रोगाशी झुंज देत आहे. आता तिला तिच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे. ज्या प्रकल्पांसाठी अभिनेत्रीने निर्मात्यांकडून आगाऊ फी घेतली होती, ते सर्व पैसे तिने निर्मात्यांना परत केले आहेत. सामंथा शेवटची पौराणिक चित्रपट शकुंतलममध्ये दिसली होती, जो बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल बोलायचे झाले तर ती विजय देवरकोंडा सोबत कुशी या चित्रपटात दिसणार आहेयाशिवाय राज आणि डीके यांच्या सिटाडेल या मालिकेतही सामंथा दिसणार आहे. या मालिकेत सामंथासोबत वरुण धवन आहे.

# जान्हवी कपूरचा रॅम्पवॉक



फॅशन डिझाइन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) द्वारे आयोजित इंडिया कॉउचर वीक 26 जुलैपासून सुरू झाला आहे. येथे इंडस्ट्रीतील सर्व मोठ्या डिझायनर्सनी त्यांचे कलेक्शन सादर केले. जान्हवी कपूर या कार्यक्रमात रॅम्पवर आली आणि फॅशन डिझायनर गौरव गुप्तासाठी शोस्टॉपर बनली. जान्हवीने निळ्या रंगाच्या लेहंग्यामध्ये रॅम्पवॉक केला. कार्यक्रमात जान्हवी शानदार निळ्या रंगाच्या लेहेंग्यात खूपच सुंदर दिसत आहे. तिने लेहेंग्यासोबत मॅचिंग स्ट्रेपी ब्लाउज आणि केप दुपट्टा घातला होता. अभिनेत्रीने न्यूड मेकअप आणि वेवी हेयर शैलीने या लुकला पूरक केले आहे. जान्हवीने अतिशय ग्रेस आणि ग्लॅमरसह रॅम्पवॉक केला. या कार्यक्रमातील जान्हवीचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यावर तिचे चाहते कमेंट करत तिचे कौतुक करत आहेत. जान्हवीच्या व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'बॉलिवुडची हॉटेस्ट सेलिब्रिटी'. दुसऱ्याने लिहिले, 'वाह'. तिसऱ्या यूजरने कमेंट करताना लिहिले, ' ती खूप सुंदर दिसत आहे'. कमेंट करताना दुसऱ्या यूजरने लिहिले, 'वाह, खूप सुंदर रंग'. जान्हवी कपूरचा बावल हा चित्रपट 21 जुलै 2023 रोजी OTT प्लॅटफॉर्म AMAZON PRIME VIDEO वर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून जान्हवीने वरुण धवनसोबत पहिल्यांदा स्क्रीन शेअर केली आहे. याशिवाय जान्हवी लवकरच ज्युनियर एनटीआरच्या चित्रपटातून टॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. 'NTR 30' पुढील वर्षी 5 मार्च 2024 रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

# प्रभासचे फेसबुक अकाउंट हॅक



गुरुवारी प्रभासचे अधिकृत फेसबुक अकाउंट हॅक झाले. प्रभासने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर ही माहिती दिली. आता त्याचे अकाउंट पूर्ववत करण्यात आले आहे. त्याने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर पोस्ट केले की त्याचे फेसबुक अकाउंट हॅक झाले आहे आणि त्याची टीम त्यावर काम करत आहे. प्रभासच्या फेसबुक अकाउंटवर जवळपास 24 मिलियन फॉलोअर्स आहेत. त्याचे अकाउंट हॅक झाल्याची माहिती देताना प्रभासने इंस्टाग्रामवर लिहिले - सर्वांना नमस्कार! माझे फेसबुक अकाउंट पेज हॅक झाले आहे. माझी टीम त्यावर काम करत आहे. गुरुवारी रात्री प्रभासच्या फेसबुक अकाउंटवरून दोन व्हिडिओ शेअर करण्यात आले. यातील एका व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते – UNLUCKY HUMANS. तर दुसऱ्या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये असे लिहिले आहे- बॉल फेल्स अराउंड द वर्ल्ड! या व्हिडिओंवर सोशल मीडिया यूजर्सनी प्रभासला ट्रोलही केले. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या आदिपुरुष या चित्रपटासाठी प्रभासला ट्रोल करताना एका यूजरने व्हिडिओवर लिहिले - दुर्दैवी आहेत ते लोक ज्यांनी आदिपुरुषला पाहिले. खाते पुनर्संचयित केल्यानंतर या टिप्पण्या देखील हटविल्या गेल्या

# कुबड्यांचा आधार घेऊन चालतोय स्टोक्स

## बेन स्टोक्सला मँचेस्टर ओरिजिनल्सविरुद्धच्या सामन्या दुखापत

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**सध्या द हंड्रेड ही स्पर्धा इंग्लंडमध्ये खेळवली जात आहे. द हंड्रेड्च्या एका सामन्यात इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सला हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे मैदान सोडावे लागले. त्यामुळे इंग्लंड संघाची चिंता वाढली आहे. श्रीलंकेविरुद्धचा पहिला कसोटी सामना १० दिवसांपेक्षा कमी कालावधीत सुरू होणार आहे. स्टोक्स या सामन्यात खेळणार की नाही, याबाबत साशंकता आहे. आता त्यांचे स्कॅनिंग करावे लागणार आहे.**



नॉर्दर्न सुपरचार्जर्सकडून खेळणाऱ्या बेन स्टोक्सला मँचेस्टर ओरिजिनल्सविरुद्धच्या सामन्यातील दुसऱ्या डावात दुखापत झाल्याने मैदान सोडावे लागले. त्याला पकडून मैदानाबाहेर न्यावे गेले. त्याच्या डाव्या पायाच्या हॅमस्ट्रिंगमध्ये दुखापत आहे. सामना संपल्यानंतर तो कुबड्यांच्या साहाय्याने चालताना दिसला. नॉर्दर्न सुपरचार्जर्सचा कर्णधार हॅरी ब्रूकने नंतर सांगितले केली की दुखापत गंभीर असू शकते. या दुखापतीनंतर बेन स्टोक्स कुबड्यांचा आधार घेत चालताना दिसत आहे. त्याचे हे फोटो व्हायरल झाले आहेत.ओल्ड ट्रॅफर्ड येथे मँचेस्टर ओरिजिनल्सविरुद्ध सुपरचार्जर्सच्या १५३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना स्टोक्सला धाव घेताना त्याच्या हॅमस्ट्रिंगचा त्रास झाला. नॉन-स्ट्रायकरच्या बाजूने झटपट धाव घेत असताना, स्टोक्स त्याच्या डाव्या पायाला धरून मैदानात पडला होता. स्टोक्स दोन धावांवर रिटायर्ड हर्ट झाला आणि त्याच्या जागी त्याचा हॅरी ब्रूक मैदानात आला. सामना संपल्यानंतरही तो कुबड्यांच्या सहाय्याने चालत होता आणि त्याच अवस्थेत चाहत्यांना ऑटोग्राफही देत होता. स्टोक्सला याआधी डाव्या पायाच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. अशा स्थितीत आता हॅमस्ट्रिंगची दुखापत ही इंग्लंडसाठी चिंतेची बाब आहे. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला आधीच सलामीवीर झॅक क्रॉऊलीची कमी भासणार आहे. त्यात आता स्टोक्सची दुखापत संघासाठी मोठ सेटबॅक असेल. आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२०२५ च्या गुणतालिकेत इंग्लंडचा सहाव्या स्थानावर आहे आणि जर त्यांना अंतिम फेरी गाठायची असेल तर त्यांना ही घरची मालिका एकतर्फी जिंकावी लागेल.

अशा परिस्थितीत कर्णधाराला अशाप्रकारे दुखापत होणे हा मोठा धक्का ठरू शकतो. इंग्लंड २१ ऑगस्टपासून ओल्ड ट्रॅफर्ड येथे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेला सुरुवात करेल. दुसरा सामना २९ ऑगस्टपासून लॉर्ड्सवर तर तिसरा आणि शेवटचा कसोटी सामना ६ सप्टेंबरपासून ओव्हलवर खेळवला जाईल.नॉर्दर्न सुपरचार्जर्सकडून खेळणाऱ्या बेन स्टोक्सला मँचेस्टर ओरिजिनल्सविरुद्धच्या सामन्यातील दुसऱ्या डावात दुखापत झाल्याने मैदान सोडावे लागले. त्याला पकडून मैदानाबाहेर न्यावे गेले. त्याच्या डाव्या पायाच्या हॅमस्ट्रिंगमध्ये दुखापत आहे. सामना संपल्यानंतर तो कुबड्यांच्या साहाय्याने चालताना दिसला. नॉर्दर्न सुपरचार्जर्सचा कर्णधार हॅरी ब्रूकने नंतर सांगितले केली की दुखापत गंभीर असू शकते. या दुखापतीनंतर बेन स्टोक्स कुबड्यांचा आधार घेत चालताना दिसत आहे. त्याचे हे फोटो व्हायरल झाले आहेत.ओल्ड ट्रॅफर्ड येथे मँचेस्टर ओरिजिनल्सविरुद्ध सुपरचार्जर्सच्या १५३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना स्टोक्सला धाव घेताना त्याच्या हॅमस्ट्रिंगचा त्रास झाला.

### मालिका एकतर्फी जिंकावी लागेल

नॉन-स्ट्रायकरच्या बाजूने झटपट धाव घेत असताना, स्टोक्स त्याच्या डाव्या पायाला धरून मैदानात पडला होता. स्टोक्स दोन धावांवर रिटायर्ड हर्ट झाला आणि त्याच्या जागी त्याचा हॅरी ब्रूक मैदानात आला. सामना संपल्यानंतरही तो कुबड्यांच्या सहाय्याने चालत होता आणि त्याच अवस्थेत चाहत्यांना ऑटोग्राफही देत होता. स्टोक्सला याआधी डाव्या पायाच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. अशा स्थितीत आता हॅमस्ट्रिंगची दुखापत ही इंग्लंडसाठी चिंतेची बाब आहे. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला आधीच सलामीवीर झॅक क्रॉऊलीची कमी भासणार आहे. त्यात आता स्टोक्सची दुखापत संघासाठी मोठ सेटबॅक असेल.आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२०२५ च्या गुणतालिकेत इंग्लंडचा सहाव्या स्थानावर आहे आणि जर त्यांना अंतिम फेरी गाठायची असेल तर त्यांना ही घरची मालिका एकतर्फी जिंकावी लागेल.

# नदीमला सासरे गिफ्ट म्हणून देणार 'म्हैस'

## नदीम पॅरिसहून परतल्यावर विमानतळावर त्याचे भव्य स्वागत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अर्शद नदीमने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत नवा विक्रम रचला. अर्शद नदीम हा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणारा पाकिस्तानचा पहिला ट्रॅक आणि फील्ड खेळाडू आहे. अर्शदने चार दशकांनंतर पाकिस्तानला सुवर्णपदक पटकावून दिले आहे.**




१९८४ च्या लॉस एंजिलिस ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानने हॉकीमध्ये अखेरचे सुवर्णपदक पटकावले. तेव्हापासून पाकिस्तानमध्ये त्याला सर्वांनीच डोक्यावर घेतलं आहे. त्याला बक्षीसाची रक्कम, सत्कार सोहळे आयोजित केले जात आहेत. पण यासर्वांच्या पलीकडे त्याचे सासरे त्याला म्हैस बक्षीस म्हणून देणार आहेत.पाकिस्तानचा सुवर्णपदक विजेता अर्शद नदीमच्या सासऱ्यांनी त्याचे ग्रामीण भागात झालेलं संगोपन आणि परंपरा लक्षात घेऊन त्याला एक म्हैस भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. मोहम्मद नवाज यांनी रविवारी नदीमच्या गावात स्थानिक प्रसारमाध्यमांना सांगितले की, म्हैस भेट देणे त्यांच्या गावात 'अत्यंत मौल्यवान' आणि 'सन्माननीय' मानले जाते. नदीमने पॅरिसमधील भालाफेक स्पर्धेत ९२.९७ मीटरच्या ऑलिम्पिक विक्रमी थ्रोसह सुवर्णपदक जिंकले, भारताच्या नीरज चोप्राने दुसरे स्थान पटकावले.नवाज म्हणाले, 'नदीमला त्याच्या परंपरेवर तो जिथून आला आहे, त्याचा खूप अभिमान आहे आणि त्याच्या यशानंतरही त्याचे घर अजूनही त्याचे गावच आहे आणि तो अजूनही त्याच्या आई-वडील आणि भावंडांसोबत राहतो. जेव्हा आम्ही आमच्या मुलीचे लग्न नदीमशी करायचे ठरवले, त्यावेळी तो छोट्यामोठ्या नोकऱ्या करत होता.

### नदीमने मोठ्या भावाला मिठी मारली

त्याच्या खेळाप्रति असलेली त्याची तळमळ दिसत होती. घरात आणि शेतात सतत भाला फेकण्याचा सराव करत असे. अर्शदचे सासरे पुढे म्हणाले, "जेव्हा तो आमच्या घरी येतो तेव्हा तो कशाचीही तक्रार करत नाही आणि आमच्या घरी जे काही आहे ते खातो. त्याची दोन मुले गावातील स्थानिक प्राथमिक शाळेत जाऊ लागली आहेत तर एक मुलगा अजूनही लहान आहे."पाकिस्तानचा पहिला वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता अर्शद नदीमचे मायदेशी परतल्यावर चाहत्यांनी जोरदार स्वागत केले आणि आपल्या कुटुंबाला भेटताना तो भावूक झाला. नदीम मायदेशी पोहोचल्यावर 'वॉटर कॅनन सॅल्यूट'ने त्याचे स्वागत करण्यात आले. हजारो चाहते नदीमची एक झलक पाहण्यासाठी आतुर झाले होते आणि त्याच्या नावाचा जयघोष करत होते. नदीमने पॅरिस ऑलिम्पिक भालाफेक स्पर्धेत ९२.९७ मीटर लांब भालाफेक करून सुवर्णपदक जिंकले होते. इथे पोहोचल्यावर नदीमने आई, वडील आणि मोठ्या भावाला मिठी मारली.